# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

## राजगुरुनगर

## विद्यार्थी विकास मंडळ

## अहवाल

### कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना सुरू करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन पोर्टलवर प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावास दिनांक २२ जुलै २०२५ रोजी मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर सप्टेंबर २०२५ पासून महाविद्यालयात सदर योजना कार्यान्वित करण्यात आली.

या योजनेमध्ये एकूण १३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार महाविद्यालयातील विविध विभागांमध्ये कामाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळण्याबरोबरच शिस्त, जबाबदारी, वेळेचे नियोजन आणि कार्यानुभव यांचा लाभ झाला.

सदर योजना सप्टेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या राबविण्यात आली. योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी नियमितपणे काम करून महाविद्यालयाच्या विविध प्रशासकीय व शैक्षणिक उपक्रमांमध्ये मोलाचे योगदान दिले.

प्रा. के.डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय




